# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २८३/२०२४ दिनांक- ०६/०८/२०२४.

**"गावठी कट्टा (अग्नीशास्त्र) व जिवंत काडतुस विक्री करिता हॉटेल फाउंन्टन येथे आलेल्या आरोपीतास अटक करण्यात काशिगांव गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकास यश"**

दिनांक ०२/०८/२०२४ रोजी काशिगांव पोलिस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले पो.शि./६२९८ मंगेश रक्षे यांना त्यांच्या गुप्त बातमीदार यांच्याकडुन माहीत मिळाली कि, रात्री २३.३० वा.सुमारास जिल्हा कानपुर ,राज्य उत्तर प्रदेश येथुन हॉटेल फाउंन्टन, घोडबंदर, मुंबई अहमदाबाद हायवे येथे एक इसम **गावठी कट्टा (अग्नीशस्त्र) व जिवंत काडतुस विक्री करिता येणार** असल्याची माहीती मिळाली सदर माहीती वरुण वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी सापळा रचला असता दि. ०३/०८/२०२४ रोजी रात्री १२.३० वा.सुमारास मिळालेल्या माहीतीच्या आधारे फाउंन्टन हॉटेलच्या समोर मुंबईकडे जाणा-या बस स्टॅन्डच्या रस्त्याच्या बाजुला गुप्त बातमीदार यांच्याकडुन मिळालेल्या माहीती व वर्णना प्रमाणे एक संशयित इसमास ताब्यात घेवुन त्याचे नांव, पत्ता विचारले असता त्याने त्याचे नांव **शिवकुमार जयराम पासवान**, व्यवसाय-कारागिरी, रा. बडाहार बेंदकी, जि. फतेपुर, राज्य- उत्तर प्रदेश असे असल्याचे सांगितले त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या अंगझडती मध्ये एक **गावठी कट्टा (अग्नीशस्त्र) व एक जिवंत काडतुस** इत्यादी मिळुन आल त्यास ताब्यात घेवुन त्याच्या विरुद्ध काशिगांव पोलिस स्टेशन गु.रंनं २२५/२०२४ भारतीय हत्यार कायदा सन १९५९ चे कलम ३,२५,७ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अटक आरोपीतास मा.न्यायालया समक्ष हजर केले असता आरोपी नांमे **शिवकुमार जयराम पासवान यांस दिनांक ०६/०८/२०२४ रोजी पर्येत पोलिस कस्टडी रिमांड दिली आहे.**

नमुद आरोपीताकडे तपास केला असता त्याने त्याच्याकडुन जप्त करण्यात आलेला गावठी कट्टा हे अग्निशस्त्र व जिवंत काडतुस हे कानपुर,उत्तरप्रदेश येथुन मुंबई मध्ये त्याचा मित्र अंकित यांस विक्री करिता आणले असल्याचे सांगितले असुन त्या अनुषंगाने त्याने सदर हत्यार कोणाकडुन आणले व आणखिन त्याने कोणाला हत्यार विक्री केली आहे का याबाबतचा पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, श्री. राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, काशिगांव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.

--------oooo--------